# शिक्षणातील बेरीज-वजाबाकींचा वेध

## कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांचा दिनक्रम; ऑनलाईन वाचनासह प्राचार्यांशी सं



वाचनात व्यस्त असलेले डॉ. माणिकराव साळुंखे.

सांगली जिल्ह्यातलं अडीच हजार लोकसंख्येचं सरांचं गाव. शिवाजी विद्यापीठातून ते एम. एस्सी. झाले. त्यांनी केमिस्ट्रीतून पीएच. डी. मिळवली. विवेकानंद महाविद्यालयात त्यांनी अध्यापनाचा श्रीगणेशा केला. शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची त्यांची कारकीर्द गाजली. 'कमवा व शिका' योजनेचा विस्तार करुन 'मागेल त्याला काम' योजना त्यांनी अंमलात आणली. चौदा परदेशी विद्यापीठांशी सामंजस्य करार त्यांनी केले. केंद्रीय विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातही त्यांनी कामाचा बाणा कायम ठेवला. भारती विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची सूत्रे त्यांच्या हाती आहेत. संचारबंदीने परीक्षांवर टांगलेली तलवार विद्यार्थ्यांना अस्वस्थ करत आहेत. त्याचा उतारा शोधण्यात सर गुंतले आहेत. ते सकाळी सहा वाजता उठून वॉकिंग करतात. नाश्ता केल्यानंतर नेटवर ऑनलाईन वृत्तपत्रांचे वाचन त्यांचे चुकत नाही. विद्यापीठातील डायरेक्टर्स, फॅकल्टी मेंबर्स यांच्याशी कम्युनिकेशन त्यांचे नित्याचे झाले आहे. विविध अभ्यासक्रमांच्या

### » संचारबंदीतले दिवस

लेक्चर्सचे व्हिडिओ अपलोड होतात का? विद्यार्थ्यांना असाइंमेंट दिल्या का?, किती विद्यार्थी व्हिडिओ पाहतात, याचा लेखाजोखा घेतल्याखेरीज त्यांना समाधान मिळत नाही. परीक्षा पुढे ढकलल्या गेल्याने ऑनलाईन परीक्षेवर त्यांची प्राचार्यांबरोबर चर्चा सुरू आहे. विद्यार्थ्यांना डिग्री घरी पाठविण्याचे नियोजन केले जात आहे. कोरोनामुळे यंदा प्रवेशावर काय परिणाम होतील, याचा कानोसा ते घेत आहेत. कोणत्या कोर्सेसना भविष्य असेल, याचा वेध त्यांच्याकडून घेतला जातोय.

शासनातर्फे स्पोर्टस युनिव्हर्सिटी स्थापन करण्याची पावले उचलली जात आहेत. त्यासाठी कायद्यातील तरतुदींवर ते बारकाईने लक्ष देतात. विद्यापीठीय कामकाजाचं ओझं पेलणं सरांना नवं नाही. वाचनासाठी त्यांनी युवन नोव्हाहरारीचं 'हिस्ट्री ऑफ दि फ्युचर,' 'ब्रिफ हिस्ट्री ऑफ टूमारो,' व 'ब्रिफ हिस्ट्री ऑफ ह्युमनकाइंड' पुस्तक हाती घेतलंय. रिसर्च पेपर लिहिण्यावर सरांचा भर आजही कायम आहे. 'फ्युचर ऑफ दि युनिव्हर्सिटीज' विषयावर त्यांचं लेख लिहिणं सुरु आहे. दुपारच्या विश्रांतीची वेळ सरांना मान्य नाही. सायंकाळी वॉकिंग व रात्री पुन्हा वाचन सर करतातच. बातम्या व मनोरंजनपर कार्यक्रम सरांना पाहायला आवडतात. कोरोनामुळे भविष्यात मुलांना नोकऱ्या कशा मिळणार? याचा वेध घेणे महत्त्वाचे असल्याचे ते सांगतात.

# पंचगंगेच्या प्रदूषणमुक्तीला लॉकडाऊनचा हातभार!

**(पान १ वरून)** यांनी प्राथमिक टप्प्यात पाहणी केली. पंचगंगा नदी ही १९८० च्या दरम्यान खळाळत होती. पाणी न आल्याच्या काळात लोक बैलगाडी व रिक्षाने पाण्याची पीप भरून नेत तीच पंचगंगा आज एवढी प्रदूषित झाली, की देशातील दहा सर्वाधिक प्रदूषित नद्यांपैकी एक असा बदलौकिक या नदीच्या कपाळी मारला गेला. त्याला प्रदूषण करणारे सगळेच घटक जबाबदार आहेत. सध्या सुरू आलेल्या लॉकडाऊनमुळे पंचगंगेच्या पाण्यात कमालीची सुधारणा दिसून येत आहे.

या पाण्याचा वास नाहीसा झाला आहे. हिरवटपणा कमी झाला आहे काही ठिकाणी तर तो नाहीसाच झाला आहे. तसेच इचलकरंजीपर्यंत नदी स्वच्छ दिसत आहे. या काळात नदीवर धुणे, पोहणे, अंघोळी, जनावरे धुणे व वाहने धुण्याचे सर्व प्रकार बंद झाले आहेत. त्याचबरोबर सांडपाणी मिसळण्याचे प्रमाणही कमालीचे घटले आहे. चैत्र महिन्यात गावोगावी होणाऱ्या जत्रा, यात्रा पूर्णपणे बंद आहेत. त्यामुळे नदीचा वापर कमी नव्हे, तर जवळजवळ बंदच झाला आहे. कोल्हापूर शहरात जोतिबाच्या यात्रेनिमित्त येणारे यात्रेकरू नसल्याने संपूर्ण नदीचा परिसरच हा जवळजवळ निर्मनुष्य झाला आहे. नदीला नैवेद्य अर्पण करणेही जवळजवळ बंदच आहे.


या सगळ्याचा परिणाम हा नदी स्वच्छ होण्यात झाला आहे. हीच परिस्थिती कायम ठेवण्याबाबत काय करता येईल, याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात एका अनौपचारिक चर्चा झाली. पालकमंत्री सतेज पाटील, जिल्हाधिकारी दौलत देसाई, महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी आदी उपस्थित होते. त्यांनी याच काळातील नदीच्या स्थितीचा अभ्यास करण्याचे, पाण्याचे नमुने तपासण्याचे व याच्या आधारावर कोणती उपाययोजना करता येईल, त्याला दिशा देण्याचे ठरविले असून याचा अभ्यास आता सुरू झाला आहे. लॉकडाऊनच्या काळात नदी स्वच्छ राहू शकते, तर पंचगंगेची हीच परिस्थिती कायम ठेवण्यासाठी काय करता येईल, याची चाचपणी सुरू आहे. कोणत्या कारणांनी पंचगंगा स्वच्छ राहिली त्या कारणांचा शोध घेतला जात आहे. त्यासाठी विविध पातळ्यांवर अभ्यास केला जाणार आहे.

लोकमत

# पीएचडीची मौखिक परीक्षा ऑनलाइन घ्या!

## यूजीसीने विद्यापीठांना दिले निर्देश

राहुल शिंदे ।
लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व विद्यापीठांनी एम.फिल., पीएच.डी, च्या विद्यार्थ्यांच्या मौखिक परीक्षा (व्हायवा) ऑनलाईन पद्धतीने घ्याव्यात, असे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने देशातील सर्व विद्यापीठांना दिले आहेत. त्यामुळे संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कोरोनामुळे कोणतेही नुकसान होणार नाही.

कोरोनाने जगभर थैमान घातले आहे. त्यामुळे विद्यापीठांना, महाविद्यालयांना सुटी देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना घरी बसूनच आपल्या विषयाचा अभ्यास करावा लगत आहे. कोरोनाचा फैलाव होऊ नये, यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. तसेच महाविद्यालय व विद्यापीठांकडून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन केले जात आहे. परंतु, संशोधन करणाऱ्या काही विद्यार्थ्यांनी आपले शोधप्रबंध विद्यापीठाकडे जमा केले आहेत. तसेच लॉकडाऊन शिथिल झाल्यानंतर काही विद्यार्थी आपली संशोधन प्रक्रिया पूर्ण करणार आहेत. त्यांना एम. फिल., पीएच.डी.पदवी मिळण्यास अडचण येण्याची शक्यता विचारात घेऊन यूजीसीने याबाबत परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार विद्यापीठांना ऑनलाईन 'व्हायवा' घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच शोधप्रबंध जमा केल्यानंतर सहा महिन्यांच्या आत विद्यार्थ्याला सर्व प्रक्रिया पूर्ण करून पदवी देण्याची व्यवस्था करावी, असे यूजीसीने स्पष्ट केले आहे.

# पंचगंगेच्या प्रदूषणमुक्तीला लॉकडाऊनचा हातभार!

## नदी होतेय स्वच्छ; शास्त्रीय निष्कर्ष लवकरच

कोल्हापूर : चंद्रशेखर माताडे

लॉकडाऊनच्या काळात पंचगंगेच्या प्रदूषणाची पातळी कमालीची घटली आहे. विशेष म्हणजे, गेल्यावर्षी याच काळात पंचगंगेच्या पात्रात जो केंदाळाचा थर पसरला होता त्याचा यंदा मागमूसही नाही. हे ढोबळ अनुमान असले, तरी ज्या शास्त्रीय निकषांवर याची मांडणी केली जाणार आहे त्यासाठी तेरा ठिकाणांचे नमुने तपासणीसाठी घेतले जाणार आहेत. गेल्यावर्षी याच काळात कसबा बावडा येथे नदीपात्रात मासे मेल्याचे आढळले होते. यंदा तसे काहीही घडलेले नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रशांत गायकवाड, शिवाजी विद्यापीठाचे पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, उदय गायकवाड पान ४ वर >

- इचलकरंजीतून सांडपाणी मिसळत असल्याचे स्पष्ट
- इचलकरंजीच्या औद्योगिक वसाहती बंद असल्याने प्रदूषणाच्या पातळीत घट
- कोल्हापूरच्या तिन्ही औद्योगिक वसाहती बंद असल्याने नाले कोरडे
- पंचगंगा नदी स्वच्छ ठेवणे शक्य असल्याचे प्राथमिक पाहणीतून स्पष्ट
- जैविक व रासायनिक पृथक्करणानंतर चित्र स्पष्ट



कोल्हापूर : पंचगंगेच्या शांत व नितळ प्रवाहाचे छायाचित्र टिपले आहे पप्पू अत्तार यांनी.

### ...या नद्यांचा होणार अभ्यास

भोगावती, तुळशी, कुंभी व कासारी या नद्यांचा यामध्ये अभ्यास केला जाणार आहे. धामणी नदीला पाणी नसल्याने तेथील अभ्यासाचा प्रश्न समोर आलेला नाही. या नद्यांच्या अभ्यासातून पंचगंगेच्या पाण्याचा दर्जा तपासला जाणार आहे. त्यासाठी पंचगंगा नदीघाट, राजाराम बंधारा, रुई, इचलकरंजी, तेरवाड व शिरोळ येथील नदीच्या पाण्याचे नमुने घेण्यात आले आहेत. त्याचे जैविक व रासायनिक पृथक्करण केले जाणार आहे.

### ...असा होणार अभ्यास



आसुर्ले-पोर्ले, सांगरूळ, बहिरेश्वर, खडक कोगे, परिते, पंचगंगा घाट, शिंगणापूर बंधारा, पंचगंगा बंधारा, राजाराम बंधारा, शिवाजी पूल, सुर्वे बंधारा, रुई बंधारा, इचलकरंजी, तेरवाड, शिरोळ येथील पाण्याचे नमुने घेतले जाणार असून, त्यांचेही जैविक व रासायनिक पृथक्करण केले जाणार आहे.

### याही पर्यायावर विचार

सध्याच्या लॉकडाऊनच्या काळात नदी स्वच्छ राहू शकते हे प्राथमिक पाहणीतून स्पष्ट झाले आहे. जर हे शक्य झाले आहे, तर भविष्यकाळात सध्याचीच परिस्थिती कायम ठेवून नदी स्वच्छ ठेवणे शक्य असेल, तर हीच परिस्थिती कायम ठेवावी, असाही विचार पुढे येऊ शकतो. त्यामुळे भविष्यकाळात नदीचा वापर सध्या ज्या कारणांसाठी बंद झाला आहे तो तसाच ठेवता येऊ शकेल का, यावर विचार होण्याची शक्यता आहे.

# साहित्य पॅकिंगचे काम अंतिम टप्प्यात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील 'डीओटी'च्या विद्यार्थिनी वसतिगृहातील साहित्य पॅकिंगचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. कोरोना व संशयित रुग्णांसाठी तंत्रज्ञान अधिविभाग (डीओटी) विद्यार्थी-विद्यार्थिनी वसतिगृह ताब्यात घेण्यास सुरुवात झाली आहे. हे साहित्य वर्कशॉपमध्ये ठेवण्यात येत आहे.

# केतकी मेथे यांना गटेनबर्गची पीएचडी



कोल्हापूर : स्वीडन देशातील युनिव्हर्सिटी ऑफ गटनेबर्गकडून केतकी मेथे यांना पेशीशास्त्र (स्टेमसेल्स) या विषयात पीएचडी प्रदान करण्यात आली.

विद्यापीठाचे ट्रान्सप्लान्ट सर्जन प्रोफेसर मायकेल ओल्युसन यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हृदयातील पेशीसंबधी संशोधन करून पीएचडी मिळवली. त्यांचे शालेय शिक्षण विद्यापीठ हायस्कूलमध्ये तर महाविद्यालयीन शिक्षण विवेकांनद महाविद्यालयात झाले आहे. शिवाजी विद्यापीठात एमएस्सीचे शिक्षण घेऊन पुढील शिक्षणांसाठी स्वीडन येथे गेल्या आहेत. माजी नगरसेवक निशिकांत मेथे यांच्या त्या कन्या आहेत.



**मोरांचा मुक्तसंचार..** कोल्हापूर : कोरोनामुळे लॉकडाउन सुरू आहे. शिवाजी विद्यापीठात कामकाज बंद असल्याने येथील वर्दळ थांबली. त्यामुळे मोर, लांडोर स्वच्छंदपणे विहार करीत आहेत. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)